पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग
क्र.लेखा/कावि/ ५२०८ /२०१८
दि.२६/०४/२०१८

**विषय :- निविदा प्रक्रिया राबवितांना विचारात घ्यावयाचे दरांबाबत..**

**परिपत्रक,**

महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत साहित्य व साधनसामुग्री खरेदी केली जाते. तसेच मनपाचे विकासकामे/भांडवली कामांकरिता देखील ठेकेदारांमार्फत विविध साहित्य खरेदी करुन वापरले जाते. सदरचे साहित्यांची प्रमाणके/उपप्रमाणके संबंधीत पुरवठाधारक,ठेकेदार यांच्या देय बिला सोबत सादर करणेबाबत स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवाल सन २०१२-१३ मधील परिच्छेद क्र. ९ मध्ये तसेच मा.आयुक्त यांचे कडील परिपत्रक क्रमांक आ/कक्ष/कावि/१५८/२०१६ दि. ६/१०/२०१६ अन्वये कळविण्यात आले आहे. महानगरपालिकेकडे कामासाठी खरेदी केलेल्या साहित्यांची उपप्रमाणके महापालिकेस बीलासोबत उपलब्ध झालेस मनपास भविष्यातील अशा साहित्याची खरेदी रास्त बाजारभावात करण्यास मदत होते. तसेच पुढील वर्षाची निविदा प्रक्रिया राबवितांना या दरांचा आधार घेतल्यास महानगरपालिकेस रास्त दरात व दर्जेदार काम करणे सोईचे होते.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांना कळविणेत येते की, पुढील वर्षाची निविदा प्रक्रिया राबवितांना उपरोक्त प्रमाणे उपलब्ध असलेली साहित्यांचे प्रमाणके व उपप्रमाणके यांचे दरांचा विचार करुन अपेक्षित कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात यावी व त्यानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति

सर्व विभागप्रमुख
---------------- विभाग

Scanned by CamScanner